# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: https://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: fao.@sus.ac.in



वित्त व लेखा विभाग


जा.क्र. पुअहोसोविसो/वित्त व लेखा विभाग/नगदी विभाग/२०२२-२३/332

दि. २८/०६/२०२२

28 JUN 2022

## अत्यंत महत्वाचे

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये / संस्था,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर.

विषय : प्रस्तुत विद्यापीठास महाविद्यालयामार्फत / संस्थांमार्फत करण्यात येणारे सर्व आर्थिक व्यवहार हे १००% ऑनलाईन पध्दतीने करण्यात आले बाबत..

महोदय / महोदया,

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना / संस्थांना आदेशान्वये कळविण्यात येते की, दि. ३१ मार्च, २०२२ पासून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या निर्देशानुसार सर्व बँकांकडून बँक खात्यात जमा करावयाच्या रकमेच्या पहिल्या पाच TRANSACTION नंतर CASH HANDLING CHARGES आकारण्यात येत आहेत. सदर चार्जेस विद्यापीठ बँक खात्यातून कपात होत आहेत. याचा नाहक भुर्दंड विद्यापीठास सहन करावा लागत आहे. तसेच नॅक पिअर टिमच्या भेटीच्या वेळी विद्यापीठाने एकूण जमा होणाऱ्या शुल्कापैकी ९४.४४% इतकी जमा रक्कम ही ऑनलाईन पध्दतीने झाल्याचे व ९९.६१% इतक्या रकमेच्या देयकाची आदायगी ही ऑनलाईन पध्दतीने केल्याचे सांगितले होते. त्यामुळे नॅक पिअर टिमने देखील विद्यापीठास सर्व शुल्क १००% ऑनलाईन स्विकारावे व देयकाची आदायगी १००% ऑनलाईन पध्दतीने करावी असे सूचित केले होते. या वर्षापासून विद्यापीठाने एकूण जमा होणारे शुल्क १००% ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याचा व सर्व प्रकारच्या देयकांची आदायगी १००% ऑनलाईन पध्दतीने करण्याचा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र शासनाने देखील यापूर्वीच सर्व प्रकारच्या रकमा ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याचा निर्णय घेवून Government Receipt Accounting system (GRAS) कार्यान्वित केली आहे.

तरी आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, सदर परिपत्रक निर्गमित केल्यापासून प्रस्तुत विद्यापीठास महाविद्यालयामार्फत / संस्थांमार्फत करण्यात येणारे सर्व आर्थिक व्यवहार हे १००% ऑनलाईन पध्दतीने करण्यात यावेत. तसेच सर्व अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश फी, परीक्षा शुल्क, पदवी प्रमाणपत्र शुल्क, पात्रता शुल्क, स्थलांतर दाखला व स्थानांतर दाखला शुल्क, इ. विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या सर्व प्रकारचे शुल्क व इतर रकमा केवळ १००% ऑनलाईन माध्यमाव्दारे (IMPS, NEFT, RTGS, QR CODE, UPI, POS) यांच्या माध्यमातून स्विकारण्यात येतील, याची कृपया नोंद घ्यावी. व विद्यापीठास सहकार्य करावे.

(सीए. श्रेणिक शाह)
वित्त व लेखा अधिकारी

प्रत माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव :
१. मा. कुलगुरु महोदया यांचे कार्यालय.
२. मा. प्र. कुलगुरु यांचे कार्यालय.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय.